E/Sujay/ circular Marathi/ PA

# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२४—२५)/५७/२०२५

**परिपत्रक:**

विषय: **कौशल्याधारित अभ्यासक्रम/Micro-credentials सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आणि अंमलबजावणीसाठीची मानक कार्यपध्दती (SOP).**

संदर्भ: १) सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक ३१.१२.२०२४ रोजीचे पत्र.

२) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचे क्र. संकीर्ण—२०२५/ई—९४२०३६/विशि—३, दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने **(UGC)** उच्च शिक्षण संस्थांमध्ये **“कौशल्याधारित अभ्यासक्रम/Micro-credentials सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आणि अंमलबजावणीसाठीची मानक कार्यपध्दती (SOP)”** निश्चित केल्या आहेत. कौशल्याधारित अभ्यासक्रम/Micro-credentials अभ्यास केल्याने कार्यक्षमता वाढून कुशल मनुष्यबळाच्या माध्यमातून आर्थिक विकासाला पाठिंबा मिळू शकतो. तसेच सदर मार्गदर्शक तत्वे सर्व भागधारकांकडून सूचना/मते/प्रतिक्रिया मागवण्यासाठी **UGC** च्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून सूचना/अभिप्राय/प्रतिक्रिया **Google** फॉर्मद्वारे **https://forms.gle/5FM8rzGwMMFy8njRA** या लिंकवर सादर करावेत असे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी कळविले आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यायांना सूचित करण्यात येते की, सूचना/अभिप्राय/प्रतिक्रिया उपरोक्त नमूद केलेल्या **Google** फॉर्मद्वारे शासनास सादर करावेत.

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

मुंबई—४०० ०३२
१७ फेब्रुवारी, २०२५

प्रत:—

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना.

Reg/ICD/2024-25/732 dt. 10/02/2025

Supt/HC-I


**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१ Email ID:-vishi3-hted@mah.gov.in


क्रमांक:संकीर्ण-२०२५/ई- ९४२०३६/विशि-३ दिनांक: २२ जानेवारी, २०२५

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय:"कौशल्याधारित अभ्यासक्रम/Micro-credentials सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि अंमलबजावणीसाठीची मानक कार्यपद्धती (SOP).**

संदर्भ:- सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक ३१.१२.२०२४ रोजीचे पत्र.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन पत्र व सहपत्र सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) उच्च शिक्षण संस्थांमध्ये "कौशल्याधारित अभ्यासक्रम/Micro-credentials सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP)" निश्चित केल्या आहेत. कौशल्याधारित अभ्यासक्रम/Micro-credentials अभ्यास केल्याने कार्यक्षमता वाढून कुशल मनुष्यबळाच्या माध्यमातून आर्थिक विकासाला पाठिंबा मिळू शकतो. सदर मार्गदर्शक तत्त्वे सर्व भागधारकांकडून सूचना/मते/प्रतिक्रिया मागवण्यासाठी UGC च्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून आपल्या सूचना/अभिप्राय/प्रतिक्रिया Google फॉर्मद्वारे https://forms.gle/5FM8rzGwMMTjS9jRA या लिंकवर सादर करण्याबाबत आपणास विनंती करण्यात येत आहे.

सोबत: वरीलप्रमाणे

DR(CAD)

आपला

(प्र. ना. ढवळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Registrar

प्रत: १. निवडनस्ती (विशि-३)